92 .

जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
(पुरवठा शाखा)

---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी लातूर यांच्या समोरील कामकाज
माहीती अधिकार अधिनियत 2005 चे कलम 19 (1) खालील प्रथम अपील .

---

4635

क्र.2014/पुवि/केमाअ/अपील/कावी 879
दि.06/05/2014.

अनंत गौविंदराव पारसेवार,
गौविंदराज प्रिंटस रेल्वे स्टेशन रोड, अपिलार्थी
उदगीर ता उदगीर.
विरुध्द
जनमाहीती अधिकारी तथा, उत्तरार्थी
अ.का.पुरवठा, 6 केरोसीन .

**निर्णय**

अपिलार्थी श्री अनंत गोविंदराव पारसेवार रा.उदगीर यानी जनमाहीती अधिकारी यांना दि.10/02/2014 रोजी मागणी केलेल्या अर्जातील माहीती न दिलेमुळे या प्राधिकरणाकडे माहीती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) प्रथम अपील दाखल केले . दि.10/02/2014 रोजी मागणी केलेल्या अर्जातील आवश्यक असलेल्या माहीतीचे वर्णन पुढील प्रमाणे अर्जात नमुद करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी लातूर याचेंकडे दि. 05/12/2013 रोजी दाखल केलेल्या अर्जावर शासन नियमाप्रमाणे कार्यवाही न झाले बाबत या विषयाचे अनुषंगाने केलेल्या तक्रारी अर्जासदंर्भातील चौकशी व कार्यवाहीच्या अहवालाची मागणी केली आहे.

प्रथम अपील मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात सादर केले मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या कार्यालयास दि.10/04/2014 रोजी अपील प्राप्त झाले नंतर या प्राधिकरणाने अपीलार्थी व जनमाहीती अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र क्र.2014/पुवि/के.मा.अ./अपिल/कावी 879 दि.21/04/2014 अन्वये प्रथम अपील प्रकरणात दि. 29/04/2014 रोजी सुनावणी ठेवण्यात आली असल्याचे कळविण्यात आले.

दि.29/04/2014 रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी स्वत उपस्थित राहिले सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यानी दि.05/12/2013 रोजीच्या अर्जाची छायाकिंत प्रत सुनावणीच्या वेळी सादर केली. अपीलार्थी यांनी दि. 05/12/2013 रोजीच्या अर्जामध्ये दि . 29/07/2013 रोजी दिलेल्या अर्जाचा उल्लेख करण्यात आला आहे तो पुढीलप्रमाणे अशाच एका विषयात दि.29/07/2013 रोजी नियमबाहय परवान्यात बदल करून शासनास फसविले बाबत या विषयी आपणाकडे अर्ज सादर केला आहे . त्या संदर्भात पुरवठा विभागाने काहीच कार्यवाही केली नाही किंवा या बाबत अर्जदारास काही कळविले नाही असा उल्लेख करण्यात आला आहे . अर्जदाराने र.व.का.शासन परिपत्रक दि.18/01/2013 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.अशा अर्जासोबत दुर्लक्ष् केल्यास अगर निर्णय देण्यास टाळाटाळ करण्यात येत असेल तर संबधिंताविरुधः शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत स्पष्ट उल्लेख असल्याने नमुद केले आहे .नियम बाहय परवान्यात बदल करून शासनास फसविले बाबत मा.सचिव अन्न व नागरी पुरवठा मंत्रालय, मुंबई यांचे नावे अग्रेषीत केलेला दि.29/07/2013 रोजीच्या अर्जाची प्रत अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी सादर केली. सदरील अर्जामध्ये अपिलार्थी यानी पुढील बाबीचा उल्लेख केला आहे .

उदगीर शहरातील सुरेश गजानन कोटलवार यांचे नावे रॉकेलचा अर्धघावूक परवाना चालू होता मध्यंतरीच्या काळात हा परवाना बंद होता.तो परवाना पुन्हा चालू करण्यात येवून सदर परवानावर सु.ग.कोटलवार या नावाने भागीदारी फर्म ची नोंदणी कार्यालयात नोंदणी करून त्या परवान्यावर जिल्हापुरवठा अधिकारी लातूर यांचे टिपणी मंजूरी आधारे भागीदारी ची नोंद करण्यात आली प्रथम नोंदणी करताना सुरेश गजानन कोटलवार या मुळ परवानाधारकासह इतर तीन भागीदाराची नावे समाविष्ट करण्यात आली ही नावे म्हणजे रॉकेल परवाना खरेदी करणायाचे संबधित आहे श्री. सुरेश गजानन कोटलवार यांचे निधन झाले नंतर त्यांची भागीदारीतील नाव कमी करून इतर तिघाचे नावे शिल्लक ठेवण्यात आली असून त्या दिवसापासून हा परवाना मुळ परवानाधारक सुरेश गजानन कोटलवार यांचे वारसा ऐवजी खरेदीदार / भागीदार हा परवाना चालवित आहेत .विशेष म्हणजे शासनाचे दप्तरी परवानाधारकाच्या नावाच्या खरेदीदार / भागीदाराचे नावाची नोंद पुरवठा विभागाने केली आहे.

दुसया एका प्रकरणात उदगीर शहरातील किरकोळ रॉकेल परवानाधारक श्री महादेव विदयाधर स्वामी यानी आपल्याला शिक्षकाची नोकरी लागताच परवान्यावर लावलेले स्वतचे छायाचित्र बदलून वडीलाचे छायाचित्रे लावले व नंतर महादेव विदयाधर स्वामी या नावाने भागीदारी फर्मची नोंदणी केली सदर फर्ममध्ये मुळ परवानाधारक महादेव विदयाधर स्वामी यांच्या भागीदारीची नोंद नसताना देखील जिल्हा पुरवठा अधिकारी लातूर यांच्या दि.17/6/2008 च्या टिप्पणी मध्ये त्यांच्या मुळ परवान्यावर भागीदारीची नोद घेण्यात आली ,ज्या भागीदारी फर्म मध्ये मुळ परवानाधारक भागीदार नसताना आजही सदरचा परवाना भागीदारीच्या नावाने सुरू आहे, याचाच अर्थ बेकायदेशीर

जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
(पुरवठा शाखा)

---

हा परवाना वारसाऐवजी इतराचे नावे करण्यात आला असून तो नियम बाहय आहे. रॉकेलचा मुळ परवाना धारक किंवा त्यांचे वारसा व्यतीरीक्त परवाना दुसयाचे नावे करण्याची कायदयात तरतुद नाही असे नमुद करून बेकायदेशीर रित्या फेरबदल करण्यात आलेल्या परवान्याची चोकशी करून दोषीवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी मा. सचिव अन्न व नागरी पुरवठा यांना दि.29/7/2013 अन्वये केली आहे. त्या निवेदनाची प्रत माहीतीस्तव या कार्यालयास सादर केली आहे .

जन माहीती अधिकारी याना या बाबत विचारणा केली असता अपिलार्थी यानी मा. सचिव अन्न व नागरी पुरवठा यांना सादर केलेल्या अर्जाची प्रत कार्यालयास / संकलनात प्राप्त झाला किंवा कसे या बाबत खात्री करण्यात येईल . असे जनमाहीती अधिकारी यानी सुनावणीच्या वेळी सागिंतले. अपिलार्थी व जन माहीती अधिकारी यांचा युक्तीवाद लक्षात घेवून हे प्राधिकरण पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

1. अपिलार्थी याचे अपील मान्य करण्यात येते .
2. जनमाहीती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा अर्ज दि.29/7/2013 व दि.05/12/2013 मधील नमुद मुदयावरील मागणी केलेली माहीती अपिलार्थी याना विनामुल्य, आठ दिवसात उपलब्ध करून दयावी.अन्यथा महाराष्ट्र शासकीय कर्मचायाच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिंबध अधिनियम 2005 चे कलम (10) मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.
3. निम्न स्वाक्षरीत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे अपिलीय प्राधिकारी मा .राज्य माहीती आयुक्त खंडपीठ औरंगाबाद हे असून निर्णयाच्या दिंनाकापासून अपिलीय कालावधी 90 दिवसाचा आहे.
4. मा. राज्य माहीती आयुक्त खंडपीठ ओंरगाबाद यांचे कार्यालयाचा पत्ता बचत भवन लेखा व कोषागरे भवन च्या पाठीमागे औरंगाबाद .

स्थळ लातूर.
दि.06/05/2014.

06/05/2014

(डॉ प्रतिभा गोरे )
अपिलीय अधिकारी तथा
सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी लातूर .

अग्रेषीत

1 अनंत गोंविदराव पारसेवार,गोंविदराज प्रिंटस रेल्वे स्टेशन रोड, उदगीर ता उदगीर.
2 जनमाहीती अधिकारी तथा, अ.का.पुरवठा, 6 केरोसीन .याना अनुपालनार्थ .
3 जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी याना सर्कतस्थळावर प्रसिदध करणे करिता देण्यात येते .